फक्त कार्यालयीन उपयोगासाठी

84

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

## आदिवासी विकास विभाग

महाराष्ट्र राज्यातील

शासकीय आश्रम शाळेतील कृषी प्रात्यक्षिक केंद्रांचा

मुल्यमापन पाहणी अहवाल


आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था

महाराष्ट्र राज्य, २८, क्विन्स गार्डन,

पुणे – ४११ ००१.



१९८९–९०

फक्त कार्यालयीन उपयोगासाठी

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

# आदिवासी विकास विभाग

महाराष्ट्र राज्यातील

शासकीय आश्रम शाळेतील कृषी प्रात्यक्षिक केंद्रांचा

मुल्यमापन पाहणी अहवाल


## आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था

महाराष्ट्र राज्य, २८, क्विन्स गार्डन,

पुणे – ४११००१.


१९८९–९०

# प्रस्तावना

भारत शासनाने आदिवासी विकासासाठी "क्षेत्रिय नियोजन" पध्दती अवलंबिली व आदिवासींसाठी आश्रमशाळा हया त्यांच्या विकासाचे केंद्रस्थान असावे असे गृहित धरले. त्यादृष्टिने महाराष्ट्र शासनाने १९७२ पासून आदिवासी आश्रमशाळा, आदिवासी विकासाचे केंद्र समजून, आदिवासींचा या माध्यमातुन विकास करण्याचे प्रयत्न सुरू झालेत. हा उद्देश सफल होण्यासाठी प्रत्येक आश्रमशाळा जोडून बालवाडी, कृषि प्रात्यक्षिक केंद्र , आरोग्य केंद्र, व्यवसाय प्रशिक्षण केंद्र व दुग्ध व्यवसाय केंद्र सुरू करण्यांत आले. अशा आश्रमशाळांसाठी ५० ते ६० एकर जमीन प्राप्त करण्यांत आली. अशा प्रकारे महाराष्ट्रात १९७२-७३ या वर्षात या प्रकारच्या ३१ शासकीय आश्रमशाळा सुरू करण्यात आल्या. परंतु कालांतराने काही तांत्रिक अडचणींमुळे आश्रमशाळांना जोडलेल्या पूरक बाबी उदा. कृषि प्रात्यक्षिक केंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र व्यवसाय प्रशिक्षण केंद्र यांचा विकास होवू शकला नाही. त्यामुळे आश्रमशाळेतील सुरू झालेली कृषि प्रात्यक्षिक केंद्रे बंद पडली. अशी कृषि प्रात्यक्षिक केंद्रे पुढे सुरू ठेवावी अगर कसे याबाबतचा अभ्यास या संस्थेने हाती घेतला. प्रस्तुत पाहणीत महाराष्ट्र राज्यातील कृषि प्रात्यक्षिक केंद्र असलेल्या आश्रमशाळांकडून काही मुलभूत माहिती मागविण्यांत आली. त्यापैकी काही आश्रमशाळांना भेटी देण्यांत आल्या व याबाबतचा अभ्यास करण्यात आला. या पाहणीत आढळलेल्या बाबींचे समिक्षणात्मक विवेचन प्रस्तुत अहवालात करण्यांत आलेले आहे.

या पाहणीचे काम श्री. द. पा. रासकर, संशोधन अधिकारी व श्री. मु. ना. पंडितराव, संशोधन अधिकारी यांनी हाती घेवून पूर्ण केले. या पाहणीच्या कामावर श्री. मो. भा. सुराणा, उपसंचालक यांनी देखरेख करून पाहणीच्या कामासाठी मार्गदर्शन केले.

प्रस्तुत अहवाल, शासनास आदिवासी विकास संचालनालयास तसेच या क्षेत्रात काम करणा-या अधिका-यांना उपयुक्त होईल अशी मला पूर्ण आशा आहे.

[आर. एस. नेगी]

संचालक,

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,

पुणे ४११ ००१.

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय | पान क्रमांक पासून | पर्यंत |
|---|---|---|---|
| **प्रकरण** | | | |
| १. | पार्श्वभूमी | ०१ | ०५ |
| २. | पाहणीची उद्दीष्टे, कार्यपध्दती व व्याप्ती | ०६ | ०७ |
| ३. | पाहणीतील दृश्ये | ०८ | २२ |
| ४. | सूचना व शिफारशी | २३ | २९ |
| **परिशिष्ट** | | | |
| १. | कृषि प्रात्यक्षिक केंद्रे असणा-या आश्रमशाळांची यादी | ३० | ३५ |
| २. | जिल्हानिहाय शासकीय आश्रमशाळा व कृषि प्रात्यक्षिक केंद्रांची संख्या | ३६ | ३७ |
| ३. | कृषि प्रात्यक्षिक केंद्रांसाठी मिळालेल्या जमीनीचे क्षेत्र [विभागनिहाय] | ३८ | ३९ |
| ४. | कृषि प्रात्यक्षिक केंद्रातील जमीनीचे दर्जानुसार व क्षेत्राप्रमाणे वर्गीकरण. | ४० | ४१ |
| ५. | बंद असलेल्या कृषि प्रात्यक्षिक केंद्रांची कारणासुसार जिल्हानिहाय संख्या | ४२ | ४३ |
| ६. | बागायती सुविधा असलेल्या कृषि प्रात्यक्षिक केंद्रांची जिल्हानिहाय संख्या | ४४ | ४५ |

| अ.क्र. | विषय | पान क्रमांक पासून | पर्यंत |
|---|---|---|---|
| ७. | कृषि प्रात्यक्षिक केंद्रामधील जिल्हानिहाय उपलब्ध अवजारे व पशुधन संख्या | ४६ | ४७ |
| ८. | कृषि प्रात्यक्षिक केंद्रावरील कर्मचारी संख्या | ४८ | ४९ |
| ९. | उपलब्ध इमारती व कुंपण सुविधा असलेल्या कृषि प्रात्यक्षिक केंद्रांची जिल्हानिहाय संख्या | ५० | ५१ |


x x x x x x

## प्रकरण - १.

## पार्श्वभूमी

### प्रास्ताविक

१.१ भारतात स्वातंत्र्य प्राप्तीनंतर विकासासाठी पंचवार्षिक योजना हाती घेण्यात आल्या. या पंचवार्षिक योजनेत विकासाचा केंद्रबिंदू "व्यक्ती" समजून व्यक्ती - समाज - विभाग असा विकासाचा क्रम ठरविण्यात आला. परंतु "व्यक्ती" हा केंद्रबिंदू मानून विकास योजना परिणामकारक होऊ शकत नाही हे निदर्शनास आल्यानंतर यासाठी त्या व्यक्तीचा परिसर बदलणे आवश्यक आहे असे धोरण ठरविण्यांत आले. क्षेत्र विकासाप्रमाणे व्यक्तीचाही विकास होईल असे मानून क्षेत्र विकास विचार प्रणाली अंमलात आली.

१.२ शिक्षणाच्या माध्यमातून "एकात्मिक क्षेत्रविकास योजना" व त्यातून आदिवासींचा वि सर्वांगीण विकास करण्याच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र शासनाने स. क. सं. का. क्री. व प. विभाग शासन निर्णय क्र. बीसीपी १०७२/३८९३-जी, दिनांक १४ ऑगस्ट १९७२ अन्वये क्षेत्रीय सुधारणा कार्यक्रम हाती घेतला.

१.३ आश्रमशाळा ही आदिवासींच्या विकासासाठी केंद्रबिंदू मानून साधारणत: ५००० ते ७००० लोकसंख्येचा परिसर एका आश्रमशाळेच्या कक्षेत असावा व त्यात बालवाडी, कृषि प्रात्यक्षिक केंद्र, आरोग्य चिकित्सा केंद्र, व्यवसाय मार्गदर्शन केंद्र, दुग्ध व्यवसाय केंद्र यांचा समावेश असावा असे धोरण सुरुवातीस ठरविण्यात आले.

... २

१.४ आश्रमशाळा ही निवासी संस्था करून त्यातील विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण, राहण्याची व जेवण्याची व्यवस्था, पुस्तकी ज्ञानाबरोबर शेती विषयाबाबत प्रात्यक्षिक शिक्षण देण्यात यावे अशी या मागील कल्पना होती.

१.५ या योजनांतर्गत प्रत्येक आश्रमशाळेला जोडून ३० ते ४० आदिवासी मुलां/ मुलींसाठी बालवाडी असेल. त्यासाठी प्रशिक्षित व पूर्णवेळ शिक्षिका राहील. बालवाडीतील आवश्यक ते साहीत्य शासन उपलब्ध करून देईल.

१.६ तीन आश्रमशाळा समूहाच्या केंद्रठिकाणी एक आरोग्य पथक राहील. ज्याद्वारा त्या परिसरातील तथा आश्रमवासीय मुला/ मुलींचे आरोग्य प्रतिबंधक उपाय आणि उपचार केले जातील. सदरील आरोग्य पथक हे सर्व सोयी-युक्त परिपूर्ण राहील.

१.७ तसेच व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण हे या योजनेतील महत्वाचे अंग राहील. ३० प्रशिक्षणार्थींना यांस दरवर्षी/एकाच वेळेस प्रवेश मिळून सुतारकाम, लोहारकाम शिलाईकाम इ. प्रकारचे प्रशिक्षण शिक्षणाबरोबरच देण्यात येऊन त्यांना दरमहा विद्यावेतन देखिल देण्यात येईल, जेणेकरून ते प्रशिक्षणानंतर स्वावलंबी बनू शकतील.

१.८ या योजनेअंतर्गत अंदाजे ५० एकर जमिनीचे कृषि प्रक्षेत्रात रुपांतर करून त्याचा फायदा परिसरातीलआदिवासी शेतकरी आणि आश्रमवासीय विद्यार्थ्यांना व्हावा होईल, ज्याद्वारे सुधारीत शेती पध्दती, बी-बीयाणे आणि किटकनाशके यांचा वापर कसा करावा हयाचे मार्गदर्शन केले जाईल.

१.९ कृषि प्रात्यक्षिक केंद्राच्या ठिकाणी १० गाईचे संगोपन केले जाईल आणि त्यापासून मिळणारे दूध आश्रमवासीय विद्यार्थ्यांकरता विकले जावे अशी संकल्पना आदेशाद्वारे निर्गमित करण्यात आली. अशाप्रकारे या सर्व सोयीयुक्त व्यवस्था करून त्या प्रात्यक्षिक केंद्राकरिता लागणारा सेवकवर्ग तसेच आवश्यक इतर खर्च यांवर वार्षिक किती रक्कम खर्च करावे, हेही या आदेशाद्वारे स्पष्ट करण्यात आले. प्रस्तावित एका कृषि प्रात्यक्षिक केंद्राकरिता त्यावेळचा वार्षिक खर्च परिव-

प्रमाणे ठरविण्यात आला :

| | | | |
|---|---|---|---|
| अ] | नोकरवर्ग पगार | | रूपये |
| १. | शेती अधिकारी | | ५,४००/- |
| २. | वरिष्ठ लिपीक | | ३,६००/- |
| ३. | माळी | | ३,०००/- |
| ४. | सालदार | | ३,०००/- |
| | | एकुण रू. | १५,०००/- |
| ब] | मशागतीचा खर्च | | १०,०००/- |
| क] | बैलांचे संगोपन | | ७००/- |
| ड] | कार्यालय, गोदाम, औजारे व जनावरांसाठी शेड, विहीरीवर पंप हाऊस | | ४१,४००/- |
| इ] | निवास इमारतीसाठी | | ३७,७२०/- |
| फ] | बैलजोडी | | २,०००/- |
| ह] | शेती औजारे | | ५,५००/- |
| ज] | जमीन सुधारणा | | ४०,०००/- |
| | | एकुण रू. | १,३७,३२०/- |
| | | अधिक | १५,०००/- |
| | | | १,५२,३२०/- |

१.१० महाराष्ट्रात एकूण ५१ कृषि प्रात्यक्षिक केंद्राकरिता शासन निर्णयानुसार वन/महसूल/पाटबंधारे खात्याकडून तसेच खाजगीरित्या ८९६.४७ हेक्टर जमीन मिळविण्यात आली. आदिवासी उपयोजना क्षेत्रात ३८ व उपयोजनेबाहेरील क्षेत्रात १३ अशा एकूण ५१ आश्रमशाळांमध्ये कृषि प्रात्यक्षिक केंद्रे सुरु करण्यात आली. इमारती उपलब्ध करून मशागतीसाठी लागणारी औजारे देण्यात आली, पशुधनाचा पुरवठा करण्यात आला, कृषि अधिकारी, माळी व सालदार यांची नेमणूक करण्यात आली. सुधारीत बी-बियाणे, खते व किटक नाशके यांचा पुरवठा केला व याप्रमाणे शेती प्रात्यक्षिक केंद्रातील कामकाज सुरु झाले.

१.११ कृषि खात्याकडून कृषि अधिकाऱ्यांची पदे वर्ग करून भरण्यांत आली व सालदारांचे पद[ठराविकरकमेत] आदिवासी विकास अधिकारी यांचेमार्फत भरण्यात आले. कृषि अधिकारी यांनी आदिवासी विकास अधिकाऱ्यांशी संपर्क ठेवून कृषि केंद्रे कार्यान्वयीत होण्याच्या दृष्टिने प्रयत्न सुरु केले.

१.१२ महसूल/वन खात्याकडून प्राप्त झालेल्या बहुसंख्य जमिनी हलक्या व कमी प्रतीच्या होत्या. पाण्याची बारमाही सुविधा देखील उपलब्ध होऊ शकली नाही. इतकेच नव्हे तर जमिनीचा बहुतांश भाग खडकांनी तथा वनसंपत्तीने व्यापलेला असल्याने, पाहिजे तशी मशागती करीता सपाटीकरण व बांधबांधस्ती करता आली नाही. तसेच कायम स्वरूपी कुपणाची सोय नसल्याने पेरलेल्या क्षेत्रातील खरीप पिकास जंगली जनावरांचात्रास होऊन उत्पन्नात घट झाली. सुधारीत शेती औजारांचा पुरवठा अपुरा ठरला. कृषि खात्याकडून/कृषि विद्यापीठाकडून अपेक्षित तांत्रिक मार्गदर्शन घेण्यास, संबंधित अधिकाऱ्याद्वारा प्रयत्न कमी झाल्याने बहुतेक केंद्रावर उत्पन्नापेक्षा अधिक खर्च होवू लागला. योजनेचा मूळ हेतू "आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना, आदिवासी शेतकऱ्यांना शेती प्रात्यक्षिके दाखविणे" ह्यातही मुख्याध्यापक आणि कृषि अधिकारी यांच्यात योग्य समन्वय नसल्याने मूळचा उद्देश बाजूला राहिला.

१.१३ महाराष्ट्रात दिवसेंदिवस शासकीय आश्रमशाळांची मागणी वाढल्याने तद्वतच धोरणानुसार आवश्यक तेवढी जमीन मिळू न शकल्याने शासकीय आश्रमशाळांची संख्या ३२५ च्या वर जावूनही फक्त ५१ ठिकाणीच कृषि प्रात्यक्षिक केंद्राकरिताच जमिनी प्राप्त झाल्या. पर्यायाने सातत्याने ६० एकर जमीनीची मर्यादा शिथिल करून ती कमी करण्यात आली.

१.१४ शासकीय आश्रमशाळांची मागणीनुसार होणारी वाढ, चालू केलेल्या ५१ कृषि प्रात्यक्षिक केंद्रांची असमाधानकारक प्रगती यामुळे नाईलाजास्तव एक एक करतां ४४ कृषि प्रात्यक्षिक केंद्रे बंद झालीत.

१.१५ शासकीय धोरणांत मंजूर केलेले आरोग्य पथक, पशुपालन केंद्र, व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था यांनाही चालना न मिळाल्याने ती चालू होवू शकली नाहीत आणि परिणामत: फक्त आश्रमशाळा हीच संस्था कार्यान्वयीत राहीली.

१.१६ या संस्थेने या सर्व बाबींची कारणमिमांसा जाणून घेण्याकरिता व या क्षेत्राचा सखोल अभ्यास करण्याकरिता हा विषय निवडला.

## प्रकरण २:

### पाहणीची उद्दिष्टे, कार्यपध्दती व व्याप्ती :

२.१ एकात्मिक क्षेत्र विकास कार्यक्रमासंबंधी महाराष्ट्र शासन निर्णय स.क.सं.का.ग्री व प. व विभाग क्र. बीसीपी–१०७२/३८२३/जी. दिनांक १४–८–१९७२ द्वारा दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार दिनांक १.४.९० रोजी शासकीय आश्रमशाळेपैकी ५१ शाळेत शेतकी प्रात्यक्षिक केंद्र सुरु करण्यात आली. ज्या शासकीय शाळेच्या परिसरासाठी वन/महसूल व पाटबंधारे खात्याकडून जमिनी प्राप्त झाल्यात अशा ठिकाणी कृषि प्रात्यक्षिक केंद्र निर्माण करून कार्यान्वित होणा–या दृष्टिने कार्यवाही सुरु झाली. आश्रमशाळा समूहासाठी सुरुवातीला वन खात्याकडून आवश्यक इमारती बांधून मशागतीसाठी लागणारी औजारे देण्यात आली. कृषि अधिकारी, माळी व सालदार यांच्या नेमणूका करण्यात आल्या. सुधारित बियाणे, खते व किटकनाशके, कृषि अधिका–यांना देण्यात आली. परंतु बहुतेक कृषि प्रात्यक्षिक केंद्राची विकासात्मक कामे अथवा बाहेरील प्रगत कृषि विद्यापीठातील ज्ञानाचा काहीही फायदा करून न घेतल्याने त्याचा विपरित परिणाम केंद्रावर झाला.

२.२ शासनाच्या उदात्त मूलभूत हेतूप्रमाणे आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना व परिसरातील आदिवासी शेतक–यांना शेती प्रात्यक्षिकांचा काहीही लाभ मिळाला नाही व अशा प्रकारे कृषि प्रात्यक्षिक केंद्रांपैकी ४४ केंद्रातील कामकाज बंद झाल्याचे आढळले. ७ केंद्रातील कार्य कृषि अधिका–याविना अद्याप चालू आहे, म्हणून राहिलेल्या कार्याचे पुनर्विलोकन होण्याचे हेतुने प्रस्तुतचा अभ्यास करण्याचा निर्णय घेतला आहे.

२.३ वर्ष १९८८–१९८९ अखेरीस महाराष्ट्र राज्यातील एकूण ३३४ शासकीय आश्रमशाळांपैकी उपयोजना क्षेत्रातील ३८ व उपयोजना क्षेत्राबाहेरील १३ अशा एकूण ५१ आश्रमशाळा समूहाला जोडून कृषि प्रात्यक्षिक केंद्र आहेत. या केंद्रांची जिल्हानिहाय व विभाग निहाय माहिती परिशिष्ट क्र. १ मध्ये दर्शविली आहे.

....७

२.४ शासकीय आश्रमशाळा समूहातील कृषि प्रत्यक्षिक केंद्रासाठी उपलब्ध असणा-या जमीनीच्या वापरासंबंधी सर्विस्तर प्रश्नावली तयार करुन ती भरुन पाठविण्याबाबतच्या सूचना सर्व संबंधीत आश्रमशाळांच्या मुख्याध्यापकांना देण्यात आल्या होत्या. त्यांचेकडून पत्रकातील नमुन्याप्रमाणे माहिती गोळा केली. सहयाद्री विभागातील नाशिक, ठाणे, धुळे व गोंडवन विभागातील गडचिरोली, यवतमाळ, नांदेड या जिल्हयातील आश्रमशाळांना समक्ष भेटी देवून दिलेली माहिती पडताळून पाहिली व कृषि प्रात्यक्षिक केंद्रातील जमीनींची पाहणी केली.

२.५ आदिवासी विकास अधिकारी व शेती केंद्राशी संबंधित मुख्याध्यापक यांचेशी संपर्क साधून प्रात्यक्षिक केंद्रातील उणीवा यांची सर्विस्तर चर्चा करुन त्यांनी दिलेल्या सूचनांची नोंद अहवालात घेण्यांत आली.

## प्रकरण - ३.

## पाहणीतील दृश्ये.

३.१ आपला देश शेती प्रधान असल्याने "शेती" हा अर्थव्यवस्थेचा फार मोठा आधारभूत पाया आहे. ~~प्रत्येक~~ प्रत्यक्ष उत्पादनात सुपीक जमीन व साधन सामुग्रीला फार महत्व आहे. विशेषत: पाणीपुरवठा, खते, बी-बियाणे व सुधारित अवजारे इत्यादी उत्पादन साधनांचा यथायोग्य वापर केला तरच उत्पादनात वाढ होत असते. त्यातल्या त्यात या बाबींची तांत्रिक मार्गदर्शनाची फार गरज आहे. दुर्गम भागात राहणा-या लोकांना अशा तंत्रज्ञाची महती कोणीही नाकारणार नाही. अशा अविकासीत भागात शेती विकासाचे तंत्र पोहोचविण्याचे ~~जोखीम~~ अवघड काम काही प्रात्यक्षिक केंद्रांमार्फत केले जाते. अशा शासकीय आश्रमशाळेतील कृषि प्रात्यक्षिक केंद्रांची स्थिती कशी आहे याचे निवेदन या प्रकरणांत ~~करण्यात~~ करण्यात आले आहे.

३.२ **कृषि प्रात्यक्षिक केंद्रची विभागणी :-**

महाराष्ट्र राज्यात १-४-८९ अखेर एकूण ३० जिल्हयांपैकी २४ जिल्हयात ३३४ आश्रमशाळा आहेत. ३३४ आश्रमशाळांपैकी २१७ आश्रमशाळा हया सहयाद्री विभागात तर ११७ या गोंडवन विभागात आढळतात. कृषि प्रात्यक्षिक केंद्र असलेल्या शासकीय आश्रमशाळांच्या बाबतीत महाराष्ट्रातील ३० जिल्हयांपैकी १८ जिल्हयात आश्रमशाळेला जोडून कृषि प्रात्यक्षिक केंद्र असलेले शाळा समूह आहेत. त्यापैकी सहयाद्री विभागात ३३ व गोंडवन विभागात १८ अशी ५१ प्रात्यक्षिक केंद्रांची विभागणी आढळते.

सहयाद्री विभागात नाशिक मध्ये ७, धुळयामध्ये ६ तर ठाणे व जळगांव जिल्हयामध्ये प्रत्येकी ४ शेती प्रात्यक्षिक केंद्रे प्रामुख्याने आढळतात.

गोंडवन विभागात नांदेड व गडचिरोली जिल्हयामध्ये प्रत्येकी ५ कृषि प्रात्यक्षिक केंद्र आहेत. या शेती प्रात्यक्षिक केंद्रांचे एकूण शासकीय आश्रमशाळेचे प्रमाण काढले तर ते जवळपास ६ : १ असे येते याची विभागणी उपयोजना क्षेत्रात व उपयोजना क्षेत्राबाहेर कशी आहे हे पाहिले असता ३८ शेती प्रात्यक्षिक केंद्र ही उपयोजना क्षेत्रात व १३ उपयोजना ~~क्षेत्राबाहेर~~ बाह्यक्षेत्रात आहेत. या आश्रमशाळा समूहाच्या विभागणीचे प्रमाण उपयोजना व उपयोजना बाहेर क्षेत्राशी साधारणत: ३ : १ असे आहे.

तालुका निहाय व गाव निहाय आश्रमशाळांची माहिती या अहवालांच्या शेवटी जोडलेल्या परिशिष्टक्र. १ मध्ये देण्यात आलेली आहे. याचा अभ्यास केला असता असे आढळते की कृषि प्रात्यक्षिक केंद्र असलेल्या आश्रमशाळांची विभागणी असंतुलीत झालेली दिसते. आश्रमशाळेत जोडून कृषि प्रात्यक्षिक केंद्र सुरु करण्यासंबंधी काही ठराविक निकष लावलेले दिसत नाहीत. लोकसंख्येच्या प्रमाणात किंवा अन्य काही उद्देश डोळंयापुढे ठेवून कृषि प्रात्यक्षिक केंद्रे सुरु केल्याचे दिसत नाही. ज्या ज्या ठिकाणी जमिनी उपलब्ध झाल्यात त्या ठिकाणी कृषि प्रात्यक्षिक केंद्र सुरु केली आहेत असे दिसते. त्यामुळे मानकानुसार केंद्र सुरु करण्याच्या पाठीमागे जे मूलभूत उद्देश आहेत. त्याची सफलता कोठेही झालेली आढळत नाही. खरे पाहिले तर काही ठराविक तत्वे डोळयासमोर ठेवून कृषि प्रात्यक्षिक केंद्रांची स्थापना करणे जरुरीचे होते असे वाटते. काही तत्वे डोळयासमोर ठेवून अशा आश्रमशाळेचे नियोजन करण्याची गरज होती.

महाराष्ट्र राज्यात आदिवासी विकासभागाव्यतिरिक्त इतर म्हणजे शेतकी खात्याकडून घेतल्या जातअसणाऱ्या केंद्राची व या आश्रमशाळेंचा समन्वय कोठेही झालेला आढळत नाही.

३.३ <u>जमिनीची प्राप्ती</u> :-

कृषि प्रात्यक्षिक केंद्र असलेल्या आश्रमशाळांच्या जमिनी वेगवेगळया खात्याकडून व खाजगी व्यक्तीकडून वर्ग करण्यात आल्या आहेत. या जमिनी संबंधित खात्याने आदिवासी विभागाकडे वर्ग केलेल्या आहेत.

काही जमिनी विकत घेण्यात आलेल्या आहेत, तर काही जमिनी दान स्माने आश्रमशाळांना मिळालेल्या आहेत. वेगवेगळया खात्याकडून मिळविलेल्या जमिनीचे क्षेत्र व वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे :

| अ.क्र. | खाते | प्राप्त केलेली जमीन[हेक्टर] | मिळालेल्या जमिनीचे एकूण जमिनीशी प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | महसूल | ४२५.१९ | ४७.४३ |
| २. | वन | ४२६.०५ | ४७.५३ |
| ३. | खाजगी व्यक्तीकडून व इतर खात्याकडून | ४५.२३ | ५.०४ |
| | एकूण : | ८९६.४७ | १००.०० |

वरील तक्त्यांवरून असे दिसून येते की कृषि प्रात्यक्षिक केंद्रास मिळालेली जमीन ही बहुतांशी महसूल व वन खात्याकडून प्राप्त झालेली आहे.

सहयाद्री विभागातील जमिनीचे क्षेत्र ५१३.४४ हेक्टर असून गोंडवन विभागातील क्षेत्र ३९३.०३ हेक्टर आहे. प्रात्यक्षिक केंद्राच्या ताब्यात असलेली सर्वात जास्त जमीन नाशिक जिल्हयात आढळते. त्या खालोखाल गोंडवन विभागातील नांदेड व गडचिरोली जिल्हयातील आश्रमशाळांना जमीनी प्राप्त झालेल्या आढळतात.

या ५१ आश्रमशाळांच्या समूहात ८९६.४७ हेक्टर जमीन आहे. या जमिनीचे सरासरी प्रमाण काढले तर एका आश्रमशाळेत १७.५८ हेक्टर किंवा ४४ एकर जमीन उपलब्ध असल्याचे आढळून येते.

या संबंधीची विभागवार आकडेवारी पुढीलपानांवर परिशिष्ट क्र. ४ मध्ये देण्यात आलेली आहे.

३.४ जमिनीची मालकी :

महाराष्ट्र राज्यात ५१ कृषि प्रात्यक्षिक केंद्राच्या ताब्यातील सर्व जमिनीची मालकी आदिवासी विकास विभागाची आहे. परंतु यासंबंधीची एकत्रित माहिती कोठेही संकलीत झालेली आढळत नाही. या ५१ आश्रमशाळांचे संनियंत्रण आदिवासी विकास संचालनालयाकडून होते, परंतु याबाबतची अद्यावत माहिती त्यांचेकडेही उपलब्ध नाही व ती ठेवण्याचा फारसा प्रयत्नही झालेला दिसत नाही. त्यामुळे कृषि प्रात्यक्षिक केंद्राच्या ताब्यात असलेल्या जमिनीचे दस्तऐवज किंवा त्यासंबंधीचे कागदपत्रे फार थोडया ठिकाणी उपलब्ध आहेत असे आढळते. खरे पाहिले असता या जमिनी ज्यावेळी आदिवासी विभागाकडे [सांस्कृतिक कार्यक्रम व क्रिडा विभाबाकडून] वर्ग झाल्या त्यावेळी त्यांची नोंद ७/१२ ला होणे आवश्यक होते. परंतु तसे अद्यापही काही ठिकाणी झालेले आढळत नाही. यामुळे ब-याच ठिकाणी शासकीय आश्रमशाळांच्या जमिनीवर अतिक्रमण झालेले दिसते. अशा जमिनींच्या काही भागांवर इतर लोक आपला हक्क दाखवून त्या जमिनीचा वापर करीत असताना आढळतात. काही ठिकाणी आश्रमशाळांच्या ताब्यात असलेल्या जमिनीची मोजणी झालेली दिसत नाही. अशा अतिक्रमण ~~असलेल्या~~ झालेल्या जमिनी त्वरीत ताब्यात घेणे जरुरीचे वाटते.

३.५ जमिनीचा प्रकार :

आश्रमशाळेत ज्या जमिनी प्राप्त झालेल्या आहेत त्यांचे त्यांच्या दर्जानुसार वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे :

.... १२

| अ.क्र. | जमिनीचा दर्जानुसार प्रकार | क्षेत्र[हेक्टर] | एकूण क्षेत्राची शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | भारी जमिन | ८६.७२ | १२.३२ |
| २. | मध्यम जमिन | १७७.४४ | २५.२० |
| ३. | हलकी जमिन | २७५.६९ | ३९.१५ |
| ४. | खडकाळ जमिन | १६४.२९ | २३.३३ |
| | एकूण : | ७०४.१४ | १००.०० |

या आश्रमशाळा समूहांच्या ताब्यात असलेली एकूण जमिन ८९६.४७ हेक्टर आहे. यापैकी शाळा इमारती व क्रिडांगणे यासाठी १९२.३३ हेक्टर जमिन ठेवलेली आहे व राहिलेली ७०४.१४ हेक्टर जमिनीची क्षेत्र कृषि प्रात्यक्षिक केंद्राच्या उद्देशासाठी ठेवण्यात आलेले आहे.

वरील तक्त्यांवरून असे निदर्शनास येते की केवळ १२.३२ % जमिन सुपीक व भारी प्रतीची आहे.

मध्यम व हलक्या प्रतीच्या जमिनीचे प्रमाण ६४.३५% आहे. एकूण जमिनीच्या ७६.६७% जमिन ही शेतीस उपयुक्त आहे. फक्त ३३.३३% जमिन ही खडकाळ आहे. हिचा उपयोग शेती विकासासाठी फारसा होणार नाही, तथापी जमिनीचा अन्य कारणांसाठी उपयोग करुन घेता येईल.

३.६ आश्रमशाळांचे स्थापनेनुसार वर्गीकरण :

प्रात्यक्षिक केंद्रे असलेल्या आश्रमशाळा समूहाची स्थापना १९७२ पासून १९७८ पर्यन्त झालेली आढळते. त्यांची वर्षनिहाय वर्गवारी खालील-प्रमाणे आहे.

| अ.क्र. | वर्ष | स्थापन झालेल्या आश्रमशाळांची संख्या |
|---|---|---|
| १. | १९७२ - १९७३ | ३१ |
| २. | १९७३ - १९७४ | ९ |
| ३. | १९७४ - १९७५ | ६ |
| ४. | १९७५ - १९७६ | २ |
| ५. | १९७६ - १९७७ | १ |
| ६. | १९७७ - १९७८ | २ |
| | एकूण: | ५१ |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, १९७२ - १९७३ या वर्षात या प्रकारच्या सगळ्यांत जास्त आश्रमशाळा समूह स्थापन झालेले आहेत. त्यानंतर अशा प्रकारची समूहे १९७८ पर्यन्त सुरू करण्यात आलेली दिसतात. १९७८-१९७९ नतर अशा प्रकारची आश्रमशाळा समूहेस्थापन झालेली नाहीत.

१९७२ च्या यासंबंधीत शासन निर्णयानुसार प्रत्येक कृषि प्रात्यक्षिक केंद्रास साधारणपणे ५० एकर जमिन तरतुद करण्यात आली होती. यासाठी एक शेती अधिकारी, एक वरिष्ठ लिपीक, एक माळी व दोन मालदार अशा पाच कर्मचाऱ्यांची शाळेसाठी कायमस्वरूपी पदे निर्माण करण्यात आलेली होती. या प्रत्येक शाळेतील शेती प्रात्यक्षि केंद्रात वर्षासाठी रु. २५,८००/- ची आवर्त

बाबी खर्चासाठी तरतुद होती. जमिन विकत घेण्यासाठी, तिच्या विकासासाठी व बांधकामासाठी जवळजवळ रु.१,४३,१२०/- ची तरतुद होती. या तरतुदीनुसार सुरुवातीला आश्रमशाळा समूह सुरु करण्यांत आले. सुरुवातील कृषि प्रात्यक्षिक केंद्राचे काम जोमात सुरु झाले. कृषि प्रात्यक्षिक केंद्रास जोडून दुग्ध व्यवसाय असल्यामुळे कृषि प्रात्यक्षिक केंद्रास हा पूरक विभाग जोडण्यांत आला. त्यामुळे ही प्रात्यक्षिक केंद्र १९७३-१९७४ पासून ख-या अर्थाने सुरु झाली. या केंद्राच्या मार्गदर्शनासाठी शेतकी अधिका-यांची नेमणूक करण्यात आली.

शासनाने पडीक जमिन वहिवाटीत आणण्यासाठी प्रत्येक एकरामागे रु ५००/- खर्च करण्यात परवानगी दिली. त्यामुळे सुरुवातीस ही केंद्रे चांगल्या प्रकारे सुरु झाली. परिसरातील शेतक-यांना व आश्रमशाळेतील मुलांना त्यांचा चांगला उपयोग होवू लागला. अशीच केंद्रे मोठया प्रमाणांत वाढवावी असे शासनाचे प्रयत्नही जारी झाले. परंतु प्रात्यक्षिक केंद्रासाठी ५० एकर जमिन मिळणे पुढे पुढे दुर्मिळ होऊ लागले आणि त्यामुळे आश्रमशाळा समूह योजनेस वेगळे स्वरुप प्राप्त झाले.

१९७८-१९७९ नंतर अशा आश्रमशाळा सुरु करण्याचे शासनाने थांबविले व आश्रमशाळेत मुलांना फक्त शिक्षण व निवासस्थान एवढया बाबी पुरविण्यांत आल्या.

सुरुवातीस कृषि प्रात्यक्षिक केंद्रासाठी शेतीची अवजारे घेण्यात आली. वेगवेगळया प्रकारचे हवामानात अनुकूल अशी पिके चांगल्या जमिनीत घेण्यांत आली, परंतु पुढे वेळेवर पैसा उपलब्ध न झाल्याने व चांगल्या देखरेखीच्या अभावांमुळे ही प्रात्यक्षिक केंद्र तोटयात येऊ लागली. १९८६ - १९८७ पासून ही केंद्रे कायम स्वरुपाची जवळजवळ बंद होऊ लागली व सध्या ५१ केंद्रांपैकी फक्त ७ केंद्रे चालू आहेत. शेतकी खात्यांच्या नियुक्तीवर असलेले अधिकारी परत त्या खात्याकडे वर्ग करण्यात आले. परंतु ज्या जागा रिक्त आहेत, त्यांचे जागी खात्याने अधिकारी नेमले नाहीत.

.... १५

कृषि प्रात्यक्षिक केंद्राचे काम आश्रमशाळेतील एका शिक्षकाकडे देण्यात आले असून त्याचेवर देखरेख शाळेचे मुख्याध्यापक करीत असतात. परंतु स्वतंत्र कर्मचारी वर्ग नसल्याने सर्व आश्रमशाळेतील कृषि प्रात्यक्षिक केंद्रे जवळजवळ बंद अवस्थेत आहेत. अशा या आश्रमशाळांच्या ~~पुनर्जीवनाची~~ पुनर्जीवनाची आज निकड आहे व जरूरीचे आहे.

३.७ <u>सामाजिक वनीकरण व फलोद्यान</u> :

महाराष्ट्र शासनाने सामाजिक वनीकरण व फलोद्यान ही योजना सुरू केली. या योजनेमध्ये सामाजिक संस्थेच्या ज्या पडीक जमिनी आहेत त्या जमिनीत झाडे लावून विकास करण्याच्या दृष्टिकोन यांत अंतर्भूत आहे. आश्रमसमूहातील कृषि प्रात्यक्षिक केंद्रातील काही जमिनी या सामाजिक वनीकरण व फलोद्यान खात्यास वर्ग करण्यांत आलेल्या आहेत. महाराष्ट्रातील कृषि प्रात्यक्षिक केंद्रास मिळालेल्या एकूण ८९६.४७ क्षेत्र हेक्टर जमिनीपैकी ३८३.३९ हेक्टर क्षेत्र सामाजिक वनीकरण व फलोत्पादन खात्यास वर्ग करण्यांत आलेले आहे. या क्षेत्राचे एकुण लागवडीलायक क्षेत्राशी प्रमाण ५४.४५ टक्के आहे. बाकीची राहीलेली जमीन ही आश्रमशाळेची आहे. सामाजिक वनीकरण व फलोत्पादन विभागाकडे जी जमिन वर्ग करण्यात आलेली आहे ती काही कालावधीपुरतीच आहे व ती पुन: आदिवासी विभागाकडे झाडांच्या जोपासनेसाठी व पुढील विकासासाठी लवकरच वर्ग करण्यांत येणार आहे. अशा सर्वच जमिनींची चांगल्या विनियोगाची जबाबदारी खात्यावरच आहे.

....१६

## तक्ता क्र. १

### विभागनिहाय सामाजिक वनीकरण/फलोत्पादन योजनांतर्गत कृषि प्रात्यक्षिक केंद्रावर लावलेली झाडे.

| अ.क्र. | झाडांचे नांव | सहयाद्री विभाग | गोंडवन विभाग | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | सुबाभूळ | १९०९० | १३८४५ | ३२९३५ |
| २. | निलगिरी | ४७४४० | १३९५६ | ६१३९६ |
| ३. | शिसव | ८४११ | ८५०० | १६९११ |
| ४. | काशीद | ८७३० | २१५४३ | ३०२७३ |
| ५. | कडूलिंब | ५३२५ | १३४४ | ६६६९ |
| ६. | शिरस | ४१०० | १३९१० | १८०१० |
| ७. | बांबू | २५६० | ६००० | ८५६० |
| ८. | अशोक | — | १०० | १०० |
| ९. | साग | २०० | ४२४५ | ४४४५ |
| १०. | चिंच | ३००० | ८०० | ३८०० |
| ११. | आंबा | १३३२५ | १९९७ | १५३२२ |
| १२. | सिताफळ | १८२०० | १३९१० | ३२११० |
| १३. | कवठ | ५० | ५०० | ५५० |
| १४. | पेरु | — | २२५० | २२५० |
| १५. | बोर | २७०० | ११६० | ३८६० |
| १६. | ओकेशिया | -- | २५१९० | २५१९० |
| १७. | प्रायोपित व इतर | ४४३११ | १७७९४ | ६२१०५ |
| | एकूण : | १७७३४२ | १४७०४४ | ३२४३८६ |

वरिल योजनांतर्गत ३८३.३९ हेक्टर क्षेत्रामध्ये एकूण ३,२४,३८६ झाडे लावण्यांत आली आहेत. त्यात सागासारखी मौल्यवान झाडांचाही समावेश आहे. सगळ्यात अधिक झाडे निलगिरीची आढळतात. तर त्या खालोखाल सिताफळ व सुबाभळीची लागवड झालेली दिसते. प्रत्यक्ष काही आश्रमशाळांना भेटी दिल्या असता असे आढळले की वरीलपैकी ४० ते ५० टक्के झाडे जगली आहेत. पाहणीचे वेळी अदमासे १,५५,००० झाडे जिवंत असल्याचे आढळले. बाकीच्या जमिनीवर ५० ते ६० टक्के झाडे मेलेली आहेत. त्याशिवाय नवीन झाडे लावून ती वाढविण्याचा फारसा प्रयत्न झालेला दिसत नाही. ब-याच ठिकाणी जमिन ओसाड पडलेली आढळते.

सामाजिक वनीकरण व फलोत्पादन खात्याकडे दिलेली जमिन ही आदिवासी विकास विभागाकडे लवकरच वर्ग होणार आहे व त्यापुढे या जमिनीत लावलेल्या झाडांची व्यवस्था पाहण्याची जबाबदारी आदिवासी खात्यावर येणार आहे.

३.८ <u>बागायती सुविधा :</u>

शेती प्रात्यक्षिक केंद्राच्या विकासासाठी विहीरीचे पाटबंधा-यांच्या पाण्याचे महत्व कोणीही नाकारणार नाही. सध्या ५१ कृषि प्रात्यक्षिक केंद्रांपैकी फक्त काही प्रात्यक्षिक केंद्रात विहीरीच्या पाण्याचा बागायती शेतीसाठी उपयोग केला जातो व ही बागायत बहुतांशी किफायतशीर झालेली आहे. त्यामुळे जिरायत शेतीवर असलेल्या कृषि प्रात्यक्षिक केंद्रच्या आश्रमशाळा ज्या ठिकाणी पाण्याची उपलब्धता आहे तेथे बागायती करण्यात आलेली दिसून येते. बागायत क्षेत्र असलेल्या अशा आश्रमशाळा समुहांची भाजी लागवडीची उपयुक्तता सर्वांना पटू लागली आहे. त्यामुळे जिरायत जमिनीचे रुपांतर बागायत जमिनीमध्ये करणे हा एक महत्वाचा उपक्रम आश्रमशाळा समुहासमोर आहे. याबाबत चौकशी केली असता शेती प्रात्यक्षिक केंद्रावर अन्य ठिकाणी पाणी उपलब्धता अजमावल्याचे २१ आश्रमशाळांनी सांगितले आहे.

....१८

सध्या ५१ आश्रमशाळांपैकी १५ आश्रमशाळा हया विहीरीच्या पाण्यांचा उपयोग बागायतीसाठी करतात. ८ आश्रमशाळा नदीच्या पाण्याचा उपयोग, ९ शाळांमधून नाल्यांच्या पाण्याचा उपयोग व १ आश्रमशाळेमधून पाटबंधा-याच्या पाण्याचा उपयोग करून बागायती पिके काढण्याचा उपक्रम करित आहेत. जवळ जवळ ३१ आश्रमशाळा या ना त्या प्रकारे नैसर्गिक पाण्याचा उपयोग करून जिरायत जमिन बागायत क्षेत्राखाली आणण्याच्या प्रयत्नात आहेत. बागायतीसाठी विविध साधनांचा उपयोग घेत असलेल्या आश्रमशाळेचे वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | बागायतीचे साधन | आश्रमशाळांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | विहीर | १५ | ४५.४५ |
| २. | नदी | ८ | २४.२४ |
| ३. | नाला | ९ | २७.२८ |
| ४. | पाटबंधा-याचे | १ | ३.०३ |
| | एकूण | ३१ | १००.०० |

वरील तक्त्यांवरून असे दिसते की विहीर बागायतीस कृषि प्रात्यक्षिक केंद्रास वाव आहे. काही ठिकाणे नदी व नाल्याचा पाण्याचा उपयोग तात्पुरता स्वरूपात का होईना करणे शक्य आहे. या शेती प्रात्यक्षिक केंद्रांना बारमाही पाणीपुरवठा सध्या कोठेही उपलब्ध नाही. तथापी ब-याच ठिकाणी हंगामी बागायत होण्याची दाट शक्यता आहे. याबाबत मते अजमावली असता असे आढळून आले की विहीर बागायत ही ५१ टक्के कृषि प्रात्यक्षिक केंद्रांनाउपयुक्त ठरेल. त्यामुळे आश्रमशाळेतील जमिनीचे थोडया फार प्रमाणात का होईना, बागायत करण्याची आज जरुरी आहे.

३.९ **शेतीची अवजारे व पशुधन :**

कृषि प्रात्यक्षिक केंद्रावर शेतीसाठी आवश्यक असलेली बरीचशी अवजारे आज उपलब्ध आहेत. परंतु ती नादुरूस्त असून तशीच कित्येक वर्षा - पासून पडून आहेत. १० केंद्रातील ऑईल इंजिन व १३ इलेक्ट्रीक मोटार आश्रम-शाळांच्या ताब्यात आहेत व त्यांचा उपयोग सध्या शेतीसाठी न करता आश्रम-शाळांच्या इतर कामासाठी केला जातो. नांगर, बैलगाडया, डस्टर व स्प्रेअर इ. अवजारे तशीच पडून आहेत. कृषि प्रात्यक्षिक केंद्रातील असलेल्या अवजारांची संख्या खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| अ. क्र. | अवजारांचे नांव | संख्या |
|---|---|---|
| १. | नांगर | ६६ |
| २. | ऑईल इंजिन | १० |
| ३. | इलेक्ट्रीक मोटार | १३ |
| ४. | वुळव | ४२ |
| ५. | पाबर | २९ |
| ६. | डस्टर | ४४ |
| ७. | स्प्रेअर | ४८ |

अशी महत्वाची अवजारे कृषी प्रात्यक्षिक केंद्राकडे अद्यापही नादुरूस्त अवस्थेत पडून आहेत.

पशुधनाच्या बाबतीत असे म्हणावेसे वाटते की फारच थोडया आश्रम-शाळेजवळ बैलजोडया आहेत. गाईचे प्रमाण तर आता जवळजवळ नाहीसे झालेले आहे. शेतीची वर उल्लेख केलेली अवजारे आहेत ती जनावरांसाठी बांधलेल्या गोठ्यात उघडया अवस्थेत व काहीही नोंद न करता पडलेली आहेत. जनावरां-साठी ब-याच आश्रमशाळेत गोठे बांधलेले आहेत. हे गोठे आज भग्न अवस्थेत

दिसत असून त्याची दुरुस्ती देखभाल असा काहीही उपक्रम झालेला दिसत नाही.

३.१० कृषि प्रात्यक्षिक केंद्रावर घेतली जाणारी पिके :

कृषी प्रात्यक्षिक केंद्रावर भौगोलिक परिस्थितीनुसार व त्या भागातील हवामानात अनुसरून पिके घेण्यात आलेली आहेत. या बाबतीत कृषि प्रात्यक्षिक केंद्र ही तोटयात येत असल्याने बंद करण्यात यावी असा बराचसा कल वरीष्ठ पातळीचा दिसतो. यासाठी खालील बाबी निदर्शनास आणणे आवश्यक आहे असे वाटते. या प्रात्यक्षिक केंद्राचा उपयोग विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी व त्या भागातील आदिवासींना मार्गदर्शनासाठी आहे व त्या प्रमाणे ते त्याचा लाभ घेत आहेत. त्यामुळे ही शिक्षणाची बाब व्यापारी दृष्टिकोनातून पहाणे संयुक्तीक होणार नाही. काही आश्रमशाळेमधील उत्पन्न व खर्चाचा अभ्यास केला असता उत्पन्न कमी होऊन खर्च अधिक असल्याचे आढळून आले आहे. या बाबतीत असे नमूद करावेसे वाटते की कृषि प्रात्यक्षिक केंद्रासाठी जो खर्च केला जातो तो सर्वच्या सर्व केंद्रातील उत्पन्नासाठी झालेला नसतो. भांडवली अनुदानाचा खर्च त्यात समाविष्ट केला जातो. भांडवली अनुदानांचा खर्च फार मोठा असल्याने कृषि प्रात्यक्षिक केंद्र हा तोटयात आहेत असा अभास निर्माण होतो. उत्पन्न व खर्च याचा शास्त्रीय पद्धतीने मांडणी करून अभ्यास केल्यास अशा आश्रमशाळा तोटयात नाहील असे आढळले. काही आश्रमशाळेत उत्पन्नापेक्षा खर्च अधिक होत असेल तरी या योजनेची उपयुक्तता सामाजिक दृष्टिकोनातून पाहून हा उपक्रम पुढे चालू ठेवणे आवश्यक आहे असे नमूद करावेसे वाटते.

३.११ शेती व्यवस्थापन :

शेती व्यवस्थापन हे एक मोठे शास्त्र आहे. हे शास्त्र ब-याच गोष्टींवर अवलंबून आहे. आश्रमशाळेसारख्या सामाजिक क्षेत्रात या शास्त्राचा फार काटेकोरपणे उपयोग करून घेतला पाहिजे, तसा उपयोग सध्या तरी केला गेलेला दिसत नाही असे निदर्शनास येते आणि त्यामुळे कृषि प्रात्यक्षिक केंद्रांची फलश्रुती आपणास पहावयास मिळत नाही. सध्या आश्रमशाळेतील व्यवस्थापन अतिशय निकृष्ट आहे आणि त्यात सुधारणा होण्याची आजची

खरी गरज आहे.

३.१२ कृषि प्रात्यक्षिक केंद्रातील उणीवा :

१. कृषि केंद्रातील ब-याचश्या जमिनी ह्या अवर्षणग्रस्त व अति पावसाच्या भागात आहेत. त्यामुळे केव्हा अतिवृष्टिने पिके येत नाहीत तर केव्हा अनावृष्टिमुळे पिकांचा नाश होतो. सर्व जमिनी या सर्वस्वी नैसर्गिक पाण्यावर अवलंबून आहेत. जिरायत पिके बागायती करण्याबाबतचा प्रयत्नही दिसत नाही.

२. महसूल व वन खात्याकडून ज्या जमिनी मिळाल्या आहेत त्या अविकसित आहेत. त्यापैकी ब-याचशा जमिनी लागवडीखाली आणलेल्या दिसत नाहीत. अशा जमिनींची पोतही फार कमी आहे. या जमिनीच्या सुधारणेसाठी शेणखताचा किंवा कंपोस्ट खताचा फारसा उपयोग झालेला दिसत नाही त्यामुळे तिची उपज शक्ती फार कमी आहे. या जमिनीत चढ-उतार असल्यामुळे या जमिनीचे बांधबंधिस्ती व सपाटीकरण न झाल्याने योग्य प्रकारे पिकांचे उत्पन्न होत नाही.

३. ही कृषि प्रात्यक्षिक केंद्र बहुतेक वन भागात किंवा त्याचे जवळपास असल्याने मोकाट जनावरांचा फारच उपद्रव होतो. अशा प्रात्यक्षिक केंद्रातील पिकाऊ जमिनींना कुंपणाची आवश्यकता असते. परंतु तसे कुंपण घालण्याचा प्रयत्नही झालेला नाही किंवा फारसे कुंपण कोठेच घातलेले दिसत नाही.

४. कृषि प्रात्यक्षिक केंद्रासाठी दैनंदिन बाबींवर होणारा खर्च तेथे असणा-या अधिका-यांच्या कक्षेत नसल्यामुळे वेळोवेळी त्याला हा खर्च मंजूर करून घेण्यासाठी वरिष्ठ अधिका-यांकडे जावे लागते. शेतीच्या बाबतीत वेळीच निर्णय घेणे हे जरूरीचे असते असे निर्णय घेण्यासाठी त्या ठिकाणी असणा-या अधिका-याला हक्क नसल्यामुळे शेती पध्दतशीर होऊ शकत नाही हा या व्यवस्थापनातील मोठा दोष आहे. ब-याच बाबी तेथील अध्यापकांना आपल्या पतीवर आणाव्या लागतात. केंव्हा केंव्हा या बाबी पतीवरही उपलब्ध होऊ शकत नाहीत.

५. आश्रमशाळेतील कृषि प्रात्यक्षिक केंद्रे बंद असण्याची कारणे विचारली असता खालील बाबी सांगण्यात आल्या :

१. कृषि खात्याकडून कर्मचारी संबंधीत खात्याकडे वर्ग झाल्या नंतर त्या ठिकाणी अन्य अधिका-यांची नियुक्ती करण्यात आली नाही आणि ती पदे तशीच रिक्त आहेत.

२. कृषि प्रात्यक्षिक केंद्रास आवश्यक असलेले पशुधन, अवजारे, बी-बियाणे, खते ही वेळेवर मिळत नाहीत.

३. कृषि प्रात्यक्षिक केंद्रास आवश्यक असलेली आर्थिक मदत वेळेवर मिळत नाही.

## प्रकरण चौथे

### आश्रमशाळेतील कृषि प्रात्यक्षिक केंद्राबाबत : काही सूचना व शिफारशी.

